॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON–425001**

**रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५**

## (निवडणूक शाखा)

जा.क्र.उमवि/२/निवडणूक/ २० /२०१५ दिनांक : ११/०४/२०१५

प्रति,
नोंदणीकृत पदवीधर गटातील
अर्ज संकलन केंद्राशी संबंधीत असलेले
महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, यांना----

**विषय :** विद्यापीठाच्या नोंदवहीत नांवे नोंदविण्यासाठी तसेच नोंदणीकृत पदवीधर म्हणून मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी संपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह स्विकृत करणेबाबत.

**संदर्भ :** विद्यापीठाचे जा.क्र.उमवि/२/निवडणूक/०९/२०१५, दि.१३/०३/२०१५

महादेय,

आपणास विदीतच आहे की, पदवीधरांची विद्यापीठाच्या नोंदवहीत नांव नोंदणी करण्याकरीता व नोंदणीकृत पदवीधराच्या मतदार यादीत नावे समाविष्ट करण्यासाठी विद्यापीठाने जाहिर प्रकटन विद्यापीठाच्या *www.nmu.ac.in*. या संकेस्थळावर प्रसिध्द केले असून जाहिर प्रकटनात नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयात दि. १४.०३.२०१५ ते दि. १३.०४.२०१५ या काळात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी ११.०० ते १५.०० वाजेपर्यन्त स्विकृत करण्यात यावेत. असे उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते.

**तथापि काही पदवीधरांच्या मागणीनुसार** ऑन लाईन अर्ज भरण्याच्या मुदतीत व विद्यापीठाने यापूर्वीच नियुक्त केलेल्या संकलन केंद्रामध्ये वाढ करणेची बाब विचाराधीन होती. त्याअनुषंगाने प्राप्त आदेशान्वये **ऑन लाईन अर्ज भरण्याची मुदत दि. २०/०४/२०१५ दु. ४.०० वाजेपावेतो वाढविण्यात येत आहे.** जाहीर प्रकटनात विद्यापीठाने जाहीर केलेल्या २३ संकलन केंद्रामध्येही वाढ करण्यात येवून खालीलप्रमाणे **०३ संकलन केंद्रे नव्याने समावेश करण्यात येत आहे.**

(१) दि बोदवड सार्वजनिक को-ऑप एज्युकेशन सोसायटी मर्यादित बोदवड संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, **बोदवड** (२) ज.जि.म.वि.प्र.समाजाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, **यावल** (३) पी.ई.एसचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, **पिंपळनेर** .

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये वरील तीन नव्याने दिलेल्या संकलन केंद्राच्या परीक्षेत्रातील नोंदणीकृत पदवीधरांनी जर दि. १३/०४/२०१५ पावेतो ऑन लाईन नाव नोंदणी केलेली असेल व त्यांना मतदाना करीता उपरोक्त तीन केंद्रे हवी असतील त्यांनी विद्यापीठास केंद्र बदलाबाबत **सध्याचा नोंदणी केलेला अर्जाचा ID क्रमांक (Registration ID) नमूद** करून लेखी कळवावे जेणे करुन त्यांना वर नमूद केलेल्या केंद्रावर मतदान करता येईल. **(ही सुविधा वर नमूद केलेल्या ०३ मतदान केंद्राकरीताच देण्यात येत आहे.)**

पुढे..२..वर



**पत्र पेटी क्र. :८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. :०२५७-२२५७४२८ ते २२५७४२९,(२२५७३४८), फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६**

**Post Box No. : ८०, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : ०२५७-२२५८४२८ to २२५८४२९(२२५७३४८),**

**Fax Nos. :०२५७-२२५८४०३, ४०६, E-mail Id ; registrar@nmu.ac.in & election२०१५@nmu.ac.in**

## (निवडणूक शाखा)

अर्ज स्विकृतीसाठी आपण जबाबदार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. संबंधीत पदवीधर ऑन लाईन माहिती भरतील. माहिती भरलेल्या अर्जाची प्रत व पोचपावती ह्यांच्या प्रती काढून त्या आपल्याकडेस स्विकृतीसाठी सादर करतील तेव्हा अर्ज स्विकृत करतांना खालील प्रमाणे काळजी घ्यावी.

१. नव्याने नोंदणी करतांना अर्जासोबत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र जोडले आहे, याची खात्री करावी.

२. अर्जावर अलीकडचे छायाचित्र लावले आहे याची खात्री करावी.

३. अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

४. तसेच ज्यांनी यापूर्वी नोंदणी केली आहे अशा पदवीधरांना पदवी प्रमाणपत्र व छायाचित्राची आवश्यकता नाही. तथापी, अर्जात पूर्वीचा नोंदणी क्रमांक असणे आवश्यक आहे.

पोच पावती एकाच पानावर दोन ठिकाणी प्रिन्ट असेल. त्यात महाविद्यालयाने अर्ज स्विकृतीची तारीख ठळकपणे नमूद करुन महाविद्यालयाचे सिल उमटवून पोच पावतीतील एक भाग फाडून संबंधीतास द्यावा व उर्वरित भाग संबंधीत अर्जास लावावा. तसेच त्याची नोंद एका स्वतंत्र नोंदवहीत करावी.

५. अर्ज स्विकृत करतांना प्रती अर्ज रुपये १२/- रोख स्वरुपात स्विकारावेत. या शुल्काची नोंद नोंदवहीत करावी. महाविद्यालयाने प्रती अर्ज रु.२/- स्वत: कडे ठेवून उर्वरीत शुल्क प्रती विद्यार्थी रुपये १०/- ह्या प्रमाणे जमा करावेत. शुल्काचा एकत्रित डिमांड ड्राफ्ट् वित्त व लेखा अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, यांच्या नावे काढावा. नोंदवही, अर्ज व शुल्काचा डिमांड ड्राफ्ट **विद्यापीठाच्या निवडणूक शाखेत दिनांक २४/०४/२०१५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यन्त सादर करावे.**

६. अपूर्ण अर्ज कोणत्याही परिस्थीतीत स्विकारु नये.

७. संकलन केंद्रावर जमा झालेल्या सर्व अर्जांचे एकत्रिकरण करुन पदवीधराचे नाव, आयडी. क्रमांक, ऑनलाईन दिनांक व ठिकाण तसेच शुल्क रू. याबाबत तपशिलवार याद्या तयार करुन अनुक्रमांकानुसार नोंदी घेवून सदर यादीच्या तीन प्रती अर्जांच्या सुरवातीला लावण्यात याव्यात व सदर यादी नुसार आलेले अनुक्रमांक अर्जावर नमूद करावेत. जेणेकरुन नोंदणीकृत पदवीधरांचे आलेल्या अर्जांची तपशिलवार माहिती तसेच शुल्क भरणे कामी सुलभता येईल.

कृपया, विद्यापीठ प्राधिकरणे निवडणूक प्रक्रियेस सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
Sd/-xxx
**(प्रा.अ.म.महाजन)**
कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी



पत्र पेटी क्र. :८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. :०२५७-२२५७४२८ ते २२५७४२९,(२२५७३४८), फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : ८०, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : ०२५७-२२५८४२८ to २२५८४२९(२२५७३४८),
Fax Nos. :०२५७-२२५८४०३, ४०६, E-mail Id ; registrar@nmu.ac.in & election२०१५@nmu.ac.in